महासत्ता एकच आवृत्ती

# ग्रंथ प्रदर्शन वाचकांसाठी पर्वणी-डॉ.शिर्के

## शाहू मिलमधील प्रदर्शनाला वाचकांचा उदंड प्रतिसाद

कोल्हापूर,ता.२८(प्रतिनिधी)-

राजर्षी शाहू महाराज स्मृती जन्मशताब्दी कृतज्ञता पर्वानिमित्त शाहू मिल येथे आयोजित करण्यात आलेल्या ग्रंथ प्रदर्शनास कोल्हापूरवासियांनी उदंड प्रतिसाद दिला. दि २८ ते ३० एप्रिल या कालावधीत संपन्न होणाऱ्या या ग्रंथप्रदर्शनाचे, कोल्हापुरातील साहित्य अकादमी पुरस्कार विजेते साहित्यिक किरण गुरव आणि सोनाली नवांगुळ यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून औपचारिक उद्घाटन करण्यात आले.

याप्रसंगी जिल्हाधिकारी राहुल रेखावार, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी .टी शिर्के, विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक डॉ. नमिता खोत, जिल्हा ग्रंथालय अधिकारी अपर्णा वाईकर आदी उपस्थित होते.



ग्रंथप्रदर्शनाची पाहणी करताना जिल्हाधिकारी राहूल रेखावार, शिवाजी विद्यापिठाचे कुलगुरु डॉ. डी.टी.शिर्के शेजारी उपस्थित इतर मान्यवर.

यावेळी बोलताना जिल्हाधिकारी म्हणाले,हे ग्रंथप्रदर्शन सर्वांसाठी खुले असून शाहू महाराजांबद्दल असलेली कृतज्ञता व्यक्त करण्याची एक संधी आहे.जिल्हावासियांनी या ग्रंथप्रदर्शनाला भेट देवून त्याला, 'न भूतो न भविष्यती' असा प्रतिसाद द्यावा. असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांनी केले. मान्यवरांनी प्रदर्शनात सहभागी झालेल्या विविध ग्रंथ प्रकाशक व वितरकांच्या स्टॉल्सची पाहणी करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

छत्रपती शाहू महाराज यांच्या जीवन व कार्यावरील ११० ग्रंथांचे शिवाजी विद्यापीठाचे विशेष दालन तर करवीर नगर वाचन मंदिरातील महाराजांवरील ४० पुस्तके हे या प्रदर्शनाचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. या ग्रंथ प्रदर्शनात राज्यभरातील सुमारे ५८ प्रकाशक सहभागी झाले असून एकूण ९५ स्टॉल्स लावण्यात आले आहेत. त्याद्वारे या प्रदर्शनात सुमारे ५० हजारांहून अधिक ग्रंथ वाचकांना पाहण्यासाठी आणि विक्रीसाठी उपलब्ध आहेत तसेच या प्रदर्शनामध्ये शाहू महाराजांच्या जीवनावरील ४४ प्रकाशित प्रबंध आणि संशोधन उपलब्ध आहेत. तीन दिवस चालणाऱ्या या ज्ञान महोत्सवात विविध बुक स्टॉलकडून, वाचकांना पुस्तक खरेदीवर १० ते ४० टक्क्यांपर्यंत घसघशीत सूट देण्यात येणार आहे. या संधीचा लाभ वाचकांनी घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

राष्ट्रीय विचाराचे एकमेव निर्भिड दैनिक
महासत्ता एकच आवृत्ती

# साजन पिटुक यांची सीमा सुरक्षा दलात निवड

**कोल्हापूर,ता.२९(प्रतिनिधी)-**

..............................

शिवाजी विद्यापीठातील डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवन मधील ''कमवा आणि शिका'' योजनेअंतर्गत काम केलेले विद्यार्थी साजन हुलाप्पा पिटुक यांची सीमा सुरक्षा दलात निवड झाली. नुकतीच त्यांची दिल्ली येथे कसम परेड घेण्यात आली.घरची परिस्थिती हालाखीची असल्याने अत्यंत जोमाने प्रामाणिकपणे, मोठ्या महत्त्वाकांक्षेने साजन यांनी 'कमवा आणि शिका' योजनेमध्ये २०१८-१९ ते २०१९-२० या कालावधीत दूरशिक्षण विभागामध्ये काम करून शिवाजी विद्यापीठातील वाणिज्य अधिविभागातून अकाऊंटन्सी विषयातून पदव्युत्तर शिक्षण घेतले. साजनचे मुळ गाव चंदगड तालुक्यातील माणगाव हे आहे. त्यांच्या या निवडीबद्दल विद्यार्थी भवनच्या आजी माजी विद्यार्थ्यांनी तसेच डॉ.आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवनचे मुख्य अधीक्षक डॉ.एन.एल.तरवाळ, सहायक अधीक्षक डी.एच.भादले, डॉ.सौ.एम. व्ही.वाळवेकर तसेच प्रशासकीय अधिकाऱ्यांनी अभिनंदन केले.

महासत्ता एकच आवृत्ती

मिळेल असे प्रतिपादन माजी

# आपण धर्मनिरपेक्ष असणे म्हणजेच भारतीय असणे

किशोर बेडकीहाळ
कोल्हापूर, ता. २८ (प्रतिनिधी)

..........................

भारताच्या निर्मिती पासूनच धर्मनिरपेक्षता आपणास मिळालेली आहे. त्यामुळे आपण धर्मनिरपेक्ष असणे म्हणजेच भारतीय असणे होय,असे प्रतिपादन जेष्ठ राजकीय विश्लेषक किशोर बेडकिहाळ यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठातील दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्रामार्फत आझादी का अमृत महोत्सव आणि शिवाजी विद्यापीठ हिरक महोत्सव निमित्ताने दि.२५ ते २९ एप्रिल या कालावधीत राज्यशास्त्र विषयाअंतर्गत आयोजित भारतातील बदलते राजकीय अंतरंग या विशेष ऑनलाईन व्याख्यानमालेअंतर्गत भारतीय राष्ट्रवाद उदय आणि विकास या विषयावर तिसरे पुष्प गुंफताना ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संचालक प्रा.डॉ.डी.के.मोरे होते. यावेळी उपकुलसचिव डॉ.एन.जे बनसोडे, सी.एस. कोतमिरे उपस्थित होते.

सांस्कृतिक राष्ट्रवाद रुजविण्याचा प्रयत्न आजच्या काळात राजकीय पक्ष करीत आहेत.भारतीय संविधानातील राष्ट्रवाद जपण्याचा प्रयत्न केला पाहिजे. जाती व धर्म याच्या पलीकडे गेल्यास नागरी समाज निर्माण होऊ शकतो .संविधानाला अंगीकृत असणारे नागरिक होणे आवश्यक आहे.असे श्री.बेडकीहाळ म्हणाले. यावेळी समन्वयक डॉ.एस. एल. गायकवाड यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. श्रीमती एस.यु.मोगले यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. सहा. प्राध्यापक डॉ.एस.डी. भोसले यांनी सूत्रसंचालन केले. सहा.प्राध्यापक डॉ.पी.एस.लोंढे यांनी आभार मानले.

राष्ट्रीय विचाराचे धडाडीचे निर्भिड दैनिक
महासत्ता एकच आवृत्ती

# रशिया-युक्रेन युध्दाचे जगावर दूरगामी परिणाम

**डॉ.अशोक चौसाळकर**

कोल्हापूर,ता.२७(प्रतिनिधी)-

.............................

सध्या युरोपात सुरु असलेले रशिया-युक्रेन युद्ध २१ व्या शतकातील सर्वात मोठे युद्ध असून भारतासह जगभरावर त्याचे दूरगामी परिणाम होतील,असे प्रतिपादन जेष्ठ विचारवंत डॉ.अशोक चौसाळकर यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठ हीरक महोत्सवानिमित्त राज्यशास्त्र विषयांतर्गत आयोजित भारतातील बदलते राजकीय अंतरंग या विशेष ऑनलाईन व्याख्यानमालेत रशिया- युक्रेन युद्ध- भारतावरील परिणाम' या विषयावर ते बोलत होते. केंद्राचे संचालक डॉ. डी.के.मोरे अध्यक्षस्थानी होते.तर उपकुलसचिव डॉ.एन. जे.बनसोडे, चंद्रकांत कोतमिरे प्रमुख उपस्थित होते.

डॉ.चौसाळकर म्हणाले,या युद्धाने जागतिक राजकारणात मोठे बदल झालेले आहेत. पेट्रोल, इंधन, अत्याधुनिक शस्त्रास्त्रे आणि अन्नधान्य निर्यात यामुळे रशियाची अर्थ व्यवस्था सुरळीत सुरु होती. तसेच, या युद्धामध्ये युरोपातील अनेक देशांचे हितसंबंध गुंतलेले आहेत. याचा भारतावर विशेष परिणाम होत आहे. जैव तेलाच्या किंमतीत वाढ होत असून महागाई वाढत आहे. भारतातील खाद्य तेलाच्या किंमती वाढत आहेत. या युद्धामुळे मनुष्य व वित्तहानी मोठ्या प्रमाणात होत आहे.

कोरोनानंतरच्या या युद्धामुळे अनेक देशांच्या अर्थव्यवस्थेवर मोठे प्रश्न निर्माण झालेले आहेत. डॉ.एस.डी.भोसले यांनी स्वागत व प्रास्ताविक केले.

समन्वयक डॉ.एस. एल. गायकवाड यांनी परिचय करून दिला. डॉ.पी.एन. देवळी यांनी सूत्रसंचालन केले. समन्वयक डॉ.नितीन रणदिवे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

30 APR 2022 पुढारी

# कलानगरीच्या भाग्यविधात्याला मुजरा

## 'स्वरांजली लोकराजाला' कार्यक्रम उत्साहात : सप्तसुरांनी बहरली शाहू मिल

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

'हिरे-माणके-सोने उधळा जयजयकार करा, जय राजर्षी शाहूराजा तुजला हा मुजरा... आदर्शच तू लोकनायका, धर्मसंस्कृतीचा अग्रदूत तू समाजपुरुषा समता क्रांतीचा... शाहिरांचा रणमल्लांचा जिवलग तू मानी... जय राजर्षी शाहूराजा तुजला हा मुजरा', अशा भावनेने कलानगरी कोल्हापूरच्या भाग्यविधात्याला मानाचा मुजरा करण्यात आला.

लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू स्मृती शताब्दी कृतज्ञता पर्वअंतर्गत शुक्रवारी शाहू मिल येथे 'स्वरांजली लोकराजाला' हा कार्यक्रम झाला. शिवाजी विद्यापीठ संगीत व नाट्यशास्त्र विभाग, गुणिदास फाऊंडेशन आणि गायन समाज देवल क्लब यांच्या वतीने हा कार्यक्रम झाला. मृणालिनी परुळेकर यांचे व्हायोलिन वादन, गुरुनाथ ढोले, प्रदीप जिरगे, भूषण साठम, ऋतिक साठम या वाद्यवृंदाने सादरीकरण केले. गौतमी चिपळूणकर आणि पं. विनोद डिग्रजकर यांनी शास्त्रीय गायन, तर डॉ. भाग्यश्री मुळ्ये, महेश हिरेमठ, शुभांगी जोशी, करण कागले यांनी सुगम संगीत सादर केले. लोकराजा राजर्षी शाहूंच्या प्रतिमेचे पूजन देवल क्लबचे विनोद डिग्रजकर, विनोद ठाकूर-देसाई, निखिल भगत, गुणिदास फाऊंडेशनचे राजप्रसाद धर्माधिकारी व शिरीष सप्रे, देवल क्लबचे दिलीप गुणे, श्रीकांत डिग्रजकर, सचिन पुरोहित यांच्या हस्ते झाले.




**कोल्हापूर : लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू कृतज्ञता पर्वअंतर्गत शुक्रवारी शाहू मिल येथे 'स्वरांजली लोकराजाला' हा कार्यक्रम झाला. (छाया : नाज ट्रेनर)**

पुढारी

# साजन पिटुके याची निवड

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवनमधील कमवा आणि शिका योजनेतील विद्यार्थी साजन हुलाप्पा पिटुके (रा. माणगाव, ता. चंदगड) याची सीमा सुरक्षा दलात निवड झाली. साजन दूरशिक्षण विभागात काम करून विद्यापीठातील वाणिज्य अधिविभागातून अकौटन्सी विषयातून पदव्युत्तर शिक्षण घेतले आहे.

पुढारी

# विद्यापीठात सोमवारपासून राजर्षी शाहू स्मृतिशताब्दी सप्ताह

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृतिशताब्दी वर्षानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या वतीने दि. २ ते ७ मे या कालावधीत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती महोत्सव समितीच्या अध्यक्षा डॉ.भारती पाटील यांनी दिली.

दि. २ मे रोजी सकाळी साडे दहा वाजता विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये पुस्तक प्रदर्शन उद्घाटन समारंभाचे आयोजन केले आहे. दि. ४ मे रोजी सायंकाळी ५ वाजता विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीसमोर पथनाट्य सादरीकरण होणार आहे.

दि. ५ मे रोजी सकाळी १० वाजता शाहू संशोधन केंद्रामध्ये चित्र प्रदर्शन, फोटो प्रदर्शनास प्रारंभ होणार आहे. यानंतर ११ वाजता राजर्षी शाहू छत्रपती : जीवन व कार्य या विषयावर अर्थतज्ज्ञ डॉ. यशवंतराव थोरात यांचे व्याख्यान होणार आहे.

दुपारी १२ वाजता शाहू सिनेट सभागृहामध्ये शाहीर सदाशिवराव निकम, सिद्धनेर्ली यांच्या लोकराजा राजर्षी शाहू महाराज या पोवाड्याचे सादरीकरण होणार आहे.

दि. ६ मे रोजी सकाळी ११ वाजता मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या प्रतिमेचे पूजन होणार आहे. दि. ७ मे रोजी सायंकाळी ४ वाजता विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहामध्ये राजर्षी श्रीमती नीला जोशी आणि सोनाबाई माळी या शाहू महाराजांच्या जीवनावर आधारित ओव्यांचे सादरीकरण करणार आहेत.

पुण्यनगरी

# 'कमवा आणि शिका 'तील विद्यार्थ्याची सुरक्षा दलात निवड

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठातील डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवनमधील कमवा आणि शिका योजनेंतर्गत काम केलेला विद्यार्थी साजन हुलाप्पा पिटुक यांची सीमा सुरक्षा दलात निवड झाली.



साजन यांचे मूळ गाव चंदगड तालुक्यातील माणगाव. त्यांचे प्राथमिक शिक्षण गावातीलच केंद्रीय प्राथमिक शाळेतून, तर माध्यमिक शिक्षण छत्रपती शिवाजी हायस्कूल येथून झाले. त्यांनी बारावीचे शिक्षण बी. डी. विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, डुक्करवाडी तसेच २०१४ मध्ये डी. एड. पदवीचे शिक्षण डी. एड. कॉलेज, तुर्केवाडी येथून घेतले. त्यांचे महाविद्यालयीन शिक्षण २०१७ साली व्ही. के. चव्हाण पाटील महाविद्यालय, कार्वे येथून झाले. कमवा आणि शिका योजनेमध्ये २०१८ ते २० या कालावधीत दूरशिक्षण विभागामध्ये काम करून शिवाजी विद्यापीठातील वाणिज्य अधिविभागातून अकौंटन्सी विषयातून पदव्युत्तर शिक्षण घेतले.

30 APR 2022 सकाळ जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘लोकराजा स्टार्टअप, इनोव्हेशन फेस्टिव्हल’

## सोमवारी होणार प्रारंभ; नवसंशोधन, उद्योजकात जनजागृतीसाठी उपक्रम

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २९ : लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृती शताब्दी कृतज्ञता पर्वानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या ‘लोकराजा स्टार्टअप व इनोवेशन फेस्टिव्हल’चे आयोजन करण्यात येणार आहे. सोमवार (ता. २) ते बुधवार (ता. ४) या कालावधीत हा उपक्रम होईल, अशी माहिती शिवाजी विद्यापीठाच्या नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य केंद्राचे प्रभारी संचालक डॉ. एम. एस. देशमुख यांनी पत्रकाद्वारे दिली.






नवसंशोधन आणि उद्योजकांत जनजागृती निर्माण करणे, विद्यार्थी संशोधक व नागरिक यांना नवसंशोधनातून प्रोत्साहित करणे. तसेच तळागाळातील समस्यांचे निराकरणे करणाऱ्या संशोधनास प्रोत्साहित करणे. शैक्षणिक संस्थांना संशोधन परिसंस्था निर्माण करणेसाठी संधी देऊन प्रोत्साहित करणे इत्यादी उद्देश नजरेसमोर ठेवून इनोवेशन फेस्टीवल साजरा करण्यात येणार आहे.

नवसंशोधन प्रदर्शन शाहू मिलमध्ये होणार आहे. यातील उत्कृष्ट नवसंशोधक प्रकल्पांना आकर्षक, प्रोत्साहनात्मक बक्षीस व प्रशस्तिपत्र देऊन गौरविणेत येणार आहे. या उपक्रमातून जिल्ह्यातील विविध समस्यांचे निराकरण करणेसाठी, नवसंशोधकांना प्रोत्साहित करणेसाठी आणि नवउद्योजकांना उभारी देणेसाठी व्यासपीठ उपलब्ध करून दिले जाणार आहे. फेस्टिव्हलमध्ये जिल्ह्यातील नवसंशोधकांनी व इच्छुकांनी सहभाग घ्यावा तसेच कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील शिक्षक व विद्यार्थी यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा प्रशासन आणि शिवाजी विद्यापीठाच्या वतीने केले आहे.

### मंगळवारी संवाद

स्टार्टअप तसेच नवसंशोधक यांच्या उद्योगातील पुढील वाटचालीसाठी गुंतवणूकदार व नवउद्योजक यांच्यामध्ये मंगळवारी (ता. ३) संवाद साधणेचा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे.